कायम विनाअनुदान तत्वावर/
~~विनाअनुदान/तत्वावर~~

2899e/22

जाक्रमा.प्राशि-१/खाप्राशा/मा./पुवि/२००४/
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : 27 OCT 2004

प्रति

१. शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, पुणे.

२. शिक्षण प्रमुख/~~प्रशासन~~ अधिकारी
महानगरपालिका/नगरपालिका शिक्षण मंडळ,

**विषय :** सन २००३ - २००४ या शैक्षणिक वर्षात नविन खाजगी प्राथमिक शाळेस परवानगी देणेबाबत. (माध्यम इंग्रजी)

**संदर्भ :** शालेय शिक्षण विभागाकडील पत्र क्रमांक व्हिएसएल/ १८०३ (५०९ /२००३)/प्राशि-३, दिनांक २४/६/२००३

उपरोक्त विषयासंबंधीचे आपल्या कार्यालयास पृष्ठांकित केलेले शासनाकडील संदर्भाधिन पत्र कृपया अवलोकनी घ्यावे.

याबाबत कळविण्यात येते की, स्थानिक गरज लक्षात घेऊन खाली नमूद केलेल्या संस्थेला तिच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातून जून, २००३ पासून इ. १ ली च्या वर्गास _____ फक्त सन२००३–०४या शैक्षणिक वर्षात ~~प्रत्यक्ष सुरु/असलेल्या वर्गासह~~ शाळा सुरु करण्यास खाली नमूद केलेल्या अटींची पुर्तता करण्याच्या शर्तीवर ~~विनाअनुदान तत्वावर/कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्यात येत आहे.~~ /~~प्रत्येक~~ इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळेस कायम विनाअनुदान तत्वावर तसेच भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे नांव व ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. |
| १] | पद्‌मजी ~~पद्‌ममणि~~ जैन श्वेतांबर तिर्थ पेढी मु.पो-पाबळ,ता-शिरुर. | पद्‌मजी ~~पद्‌मजी~~ जैन इंग्लीश स्कूल प्राथमिक शाळा | १ ली च्या वर्गास फक्त | इंग्रजी |

सदर परवानगी खालील शर्ती व अटींवर अवलंबून आहे. त्याचा भंग झाल्यास परवानगी रद्द होईल.

३.१ सदर संस्था, नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असली पाहिजे.

३.२ शाळेची इमारत व परिसर शिक्षणाकूल, स्वच्छ व सुरक्षित असला पाहिजे.

३.३ शाळेत शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारीवृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तींच्या अधिन राहून नेमला पाहिजे.

३.४ संस्थेची आर्थिक परिस्थिती, संस्थेकडील भौतिक सुविधा, व्यवस्थापनाविषयक सुविधा इत्यादी, शाळा व्यवस्थित चालण्यासाठी सुयोग्य असणे आवश्यक आहे.

३.५ संस्थेने या शाळेमध्ये शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमांची अंमलबजावणी केली पाहिजे. तसेच अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, मुल्यमापन पध्दती, शालेय व सहशालेय कार्यक्रम आणि उपक्रम यांचे सूयोग्यतेने कार्यान्वित केले पाहिजे व त्यासाठी आवश्यक सर्व सुविधा पुरविल्या पाहिजे.

३.६ संस्थेने शाळेतील विद्यार्थ्यांसाठी/कर्मचाऱ्यांसाठी विहित नोंदवह्या अद्ययावत आणि विश्वासार्ह स्वरुपात कार्यान्वित ठेवल्या पाहिजेत.

Scanned with OKEN Scanner

३.७ संस्थेने शाळेतील वातावरण शिक्षणानुकूल ठेवणे आवश्यक आहे. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये विधायक शिस्त निर्माण करणे, तसेच नमतीएरपणा, नियमितपणा आणि नियमित उपस्थिती या गोष्टी त्यांच्यावर बिंबवणे आवश्यक आहे.

३.८ संस्थेने परवानगीसाठी विहित केलेले माध्यम, शाळेची जागा इत्यादीमध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.

३.९ संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशांचे, कार्यपध्दतींचे, नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

३.१० संस्थेने विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देतांना परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळांवर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

३.११ शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

३.१२ शासनाने परवानगी दिलेल्या वर्षी संबंधित संस्थेने शाळा सुरु न केल्यास पुढील वर्षी नुतनीकरणासाठी अर्ज सक्षम अधिकाऱ्यांकडे परवानगी दिलेल्या शैक्षणिक वर्षात करणे बंधनकारक राहील. अन्यथा शासनाने दिलेली परवानगी रद्द समजण्यात येईल. एक वर्षानंतर नुतनीकरणासाठी केलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही.

---

---

सदर परवानगी पत्र प्राप्त झाल्यानंतर सक्षम प्राधिकाऱ्याने ही परवानगी संबंधित शैक्षणिक संस्थेच्या व्यवस्थापनाच्या निदर्शनास तात्काळ आणावी. सदरची बाब संस्थेच्या निदर्शनास आणल्यानंतर संस्थेने परवानगी मिळालेल्या माध्यमातून व ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु करणे आवश्यक आहे. अशा संस्थेने तद्नंतर सक्षम प्राधिकाऱ्याकडे (आपणाकडे) नविन प्राथमिक शाळा मान्यतेसाठी अर्ज करावा, असा अर्ज मिळाल्यानंतर सक्षम प्राधिकाऱ्याने शाळेची तपासणी करुन तपासणी अहवाल शिक्षण मंडळ/शिक्षण समिती यांचेकडे मान्यतेसाठी सादर करावा व शाळेच्या मान्यतेबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी. शिक्षण मंडळ/शिक्षण समितीची मान्यता मिळताच त्याची एक प्रत या कार्यालयास सादर करावी.

स्थळप्रतीवर मा. शि. उ. सं.
यांची सही असे.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१.

प्रत माहितीस्तव सविनय सादर

१. मा. अवर सचिव, महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.
२. मा. प्राथमिक शिक्षण संचालक, प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१.
३. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
४. मा. सचिव/अध्यक्ष, पद्जी जैन श्वेतांबर तिर्थ पेढी
मु.पो-पाबळ, ता-शिरुर.

4

कायम विना अनुदान तत्वावर (मराठी, हिंदी, उर्दू, इंग्लिश, इत्यादी माध्यम)

पुणे जिल्हा परीषद, पुणे
यशवंतराव चव्हाण भवन,
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प./शिक्षण/प्राथ./ /३१४
३८८ /का.प्रा.शा./ / दि. १/१०/०७

प्रति :-
मुख्याध्यापक./मुख्याध्यापिका

विषय :- कायम -विना - अनुदान तत्वावरील शासन मान्यता प्राप्त खासगी प्राथमिक शाळांना जादा/ नैसर्गिक वाढीचा / वाढीच्या प्रश्न / जादा तुकडया/ वर्ग उघडण्यास परवानगी देणेबाबत......

संदर्भ :- शासन निर्णय क्रमांक -व्ही. एल. एस. १००२/ (६०००/०२) प्रा. शि. -३. दिनांक २३ सप्टेंबर २००३

वरील विषयासंबंधीचा आपणाकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खाली नमुद केलेल्या शाळेस त्यांच्या नावासमोर दर्शविण्यात आलेल्या जादा/ नैसर्गिक वाढीचा/ वाढीच्या प्रश्न/ जादा तुकडया / वर्ग जुन २०० पासून सन २०० - २०० या शैक्षणिक वर्षापासून खाली दर्शविण्यात आलेल्या अटींच्या अधीन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| अ. क्र. | शाळेचे नाव | माध्यम | इयत्ता | तुकडी वाढ जादा/नैसर्गिक | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. पद्मभणि जैन इंग्लिश स्कूल | इंग्रजी | इ. २री<br>इ. ३री<br>इ. ४थी | नैसर्गिक | |

अटी व शर्ती

१. शाळेस शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षनिक व व्यावसायिक अर्हतेचा व आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेणी व सेवाशर्तींच्या आधीन राहून नेमला पाहिजे.
२. सदर शाळेने तुकडयासाठी सर्व भौतीक सुविधा तसेच शैक्षणिक व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करुन घेतल्या पाहिजे.
३. सदर शाळेस स्वच्छतागृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.
४. शाळेने शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.
५. सदर मंजुर करण्यात येणाऱ्या तुकडीमध्ये परीसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेच्या पटावर विपरीत परिणाम होणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे.
६. सदर शाळेच्या वर्गास/ तुकडीस विद्यार्थीसंख्या पुरेशी असणे आवश्यक आहे.
७. तपासणीअंती एकजरी अट नियमबाह्य निदर्शनास आल्यास तुकडी / वर्ग मान्यता रद्द करण्यात येईल.
८. पट व उपस्थिती वाढविण्याच्या अटीवर सदर मान्यता देण्यात येत आहे.
९. शासन निर्णय दि. ५/२/२००० नुसार विद्यार्थ्यांच्या नातेंड मध्ये जनरल रजिस्टर व शाळा सोडण्याच्या दाखल्यावर लिहणे बंधनकारक आहे.
१०. याचिका क्र. -४३५९/१९९८ मध्ये मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे प्राथ. शिक्षकासाठी डी. एड. हीच प्रशिक्षित अर्हता योग्य आहे. यामुळे प्राथमिक शिक्षकाची एच. एस. सी. डी. एड. अर्हतेचेच शिक्षक नियमानुसार नियुक्त करुन या कार्यालयाकडून त्यांची मान्यता घेणे बंधनकारक आहे.

शिक्षणाधिकारी (प्राथ)
पुणे जिल्हा परिषद, पुणे

**कायम विना अनुदान तत्त्वावर**
(मराठी,इंग्रजी, हिंदी, उर्दू , तामिळ इत्यादी माध्यम)

5

**पुणे जिल्हा परिषद, पुणे**
यशवतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्रशा/ ५६७/२०१२
पुणे १ दिनांक:- ०९/०८/२०१२

प्रति,

**मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका**

**पदममणी जैन इंग्लिश स्कूल पाबळ**
**ता.शिरुर जि.पुणे.,**

**विषय:-** कायम विना अनुदान तत्त्वावरील शासन मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना ज्यादा/नैसर्गिक वाढीचा/वाढीच्या प्राथम/जादा तुकडया/वर्ग उघडण्यास परवानगी देणेबाबत.

**संदर्भ :-** शासन निर्णय क्र. व्हीएलएस.-१००२/(१०००/०२)/प्राशि-३, दि.२३ सप्टेंबर २००३

उपरोक्त विषयासंबधीचा आपणाकडून प्राप्त झालेला प्रसताव विचारात घेता खालील नमूद केलेल्या शाळेस त्यांच्या नावासमोर दर्शविण्यात आलेल्या जादा/नैसर्गिक वाढीचा /वाढीच्या प्रथम/जादा तुकडया/वर्ग **जून२०१२, पासून सन २०१२-२०१३** या शैक्षणिक वर्षापासून खाली दर्शविण्यात आलेल्या अटी शर्तीच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | शाळेचे नाव | माध्यम | इयत्ता | तुकडी वाढ जादा/नैसर्गिक | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | पदममणी जैन इंग्लिश स्कूल पाबळ | इंग्रजी | ५ वी, ६ वी व ७ वी | नैसर्गिक वाढ | |

**अटी व शर्ती**

१) शाळेस शासनाने वेळोवेळी विहित केल्यानूसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हततेचा व आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तीच्या अधिन राहून नेमला पाहिजे.
२) सदर शाळेने तुकडयासाठी सर्व भौतिक सुविधा तसेच शैक्षणिक व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करुन नेमला पाहिजे.
३) सदर शाळेस स्वच्छतागृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.
४) शाळेने शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.
५) सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेच्या पटावर विपरीत परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.
६) सदर शाळेच्या वर्गास/तुकडीस विद्यार्थीसंख्या पुरेशी असणे आवश्यक आहे.
७) तपासणी अंती एक जरी अट नियमबाहय असलेची निदर्शनास आल्यास तुकडी/वर्ग मान्यता रद्द करण्यात येईल.
८) पट व उपस्थिती वाढविण्याच्या अटीवर सदर मान्यता देण्यात येत आहे.

**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**पुणे जिल्हा परिषद, पुणे**

प्रत :- माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना

जा.क.शिउसं/ माध्य-३/१३/प्रथम मान्यता/पुवि/२०१३
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१ यांचे कार्यालय
दिनांक :- ९|६|८|२०१३

प्रति,

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद,पुणे.

विषय :- **इंग्रजी माध्यमाच्या इ.७वी पर्यंत सुरु असलेल्या प्राथमिक शाळेस जोडून इ.८वी ते १० वीचे इंग्रजी माध्यमाचे वर्ग कायम विना अनुदान तत्वावर सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत..**
**(शासन निर्णय दिनांक १०.०३.२०१० अन्वये)**

संदर्भ- शासन पत्र क्रमांक इंमाशा/२०१३/(१/१३)माशि-१ दिनांक १५ फेब्रुवारी २०१३

वरील संदर्भीय पत्रानुसार श्री. पद्ममणी जैन श्वेतांबर तिर्थपेढी मु.पो.पाबळ ता. शिरुर जिल्हा पुणे संचलित श्री. पद्ममणी जैन इंग्लिश स्कूल मु.पो.पाबळ ता.शिरुर जिल्हा पुणे या इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळेस जोडून इ.८वी ते १० वी चे वर्ग सुरु करण्यास परवानगी मिळालेली आहे.

त्यानुसार प्रथम मान्यतेचा प्रस्ताव शासन निर्णय दिनांक १४.१०.२०१० अन्वये समितीची शिफारस करुन या कार्यालयास **तात्काळ** सादर करावा.

( बाळासाहेब ओव्हाळ )
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग पुणे-१ करिता

**प्रत माहितीस्तव सादर,**

१. मा.सु.न.जोशी,अवर सचिव,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-३२.
२. मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे-१
३. मा.अध्यक्ष,महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,शिवाजीनगर पुणे.

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी,

१. अध्यक्ष/सचिव, श्री. पद्ममणी जैन इंग्लिश स्कूल मु.पो.पाबळ ता.शिरुर जिल्हा पुणे